# महाविद्यालये होणार सोमवारपासून सुरू



कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाअंतर्गत येणारी महाविद्यालये सोमवारपासून (ता. १५) सुरू होतील. आज व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालये सुरू करण्याचे ठरविले. दोन दिवसात सर्व महाविद्यालयांना सूचना देण्यात येतील.

लॉकडाउनमुळे अकरा महिने महाविद्यालये बंद होती. दोन दिवसांपूर्वी विद्या परिषदेच्या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली होती. विद्यापीठाने प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने यु.जी. सी.च्या निर्देशानुसार महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी कोणत्या उपाययोजना करावयाच्या याचा अहवाल बनवला. तो व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला होता. त्यातील तरतुदींप्रमाणे महाविद्यालये सुरू करण्यास परिषदेच्या सदस्यांनी मंजुरी दिली. तसेच भगवान महावीर अध्यासन केंद्राचे प्रभारी समन्वयक म्हणून प्रा. डॉ. विजय ककडे यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. कायमस्वरूपी समन्वयक पदाची प्रक्रिया सुरू करण्याचेही ठरवले. मार्चमध्ये सादर केल्या जाणाऱ्या अंदाजपत्रकालाही व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

राष्ट्रीय गणित आणि विज्ञान दिनाच्या उपक्रमांसाठी विद्यापीठ फंडातून आर्थिक तरतूद केली जाणार आहे. विद्यापीठ परिसरात आढळणारे दुर्मिळ पक्षी, प्राणी यांची छायाचित्रे असणारे फलक लावले जाणार आहेत.

# विद्यापीठाच्या ५०० कोटींच्या अर्थसंकल्पाला मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सुमारे ५०० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला बुधवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

मार्च महिन्यात होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत हा अर्थसंकल्प सादर करण्याची शिफारसही आजच्या बैठकीत करण्यात आली. सोमवार दि. १५ पासून विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये सुरू करण्यास परिषदेने मान्यता दिली. उद्या गुरुवारपासून त्याबाबत संबंधित महाविद्यालयांना सूचना द्याव्यात, असेही परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

भगवान महावीर अध्यसनाच्या तात्पुरत्या समन्वयकपदी डॉ. विजय ककडे यांची नियुक्ती करण्यासही आजच्या बैठकीत मान्यता दिली. त्यासह पूर्णवेळ समन्वयकपदासाठी निवड प्रक्रिया सुरू करण्याबाबतही बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार ही प्रक्रिया सुरू होणार आहे. यावेळी तासिका तत्त्वावरील शिक्षकांबाबतही बैठकीत चर्चा झाली.

विद्यापीठ परिसरात विविध ९० प्रकारचे पक्षी आढळून येतात. या पक्ष्यांपैकी निवडक ५० पक्ष्यांची छायाचित्रे, विद्यापीठ परिसरात ठिकठिकाणी लावण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

# शिवाजी विद्यापीठाच्या ५१० कोटींच्या 'बजेट'ला मान्यता

## व्यवस्थापन परिषदेची शिफारस : पदवीचे वर्ग सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संशोधन, शिक्षणासह विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आदींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठीच्या यावर्षीच्या सुमारे ५१० कोटींच्या अंदाजपत्रकाला (बजेट) शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने बुधवारी मान्यता दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांमधील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग सोमवार (दि. १५) पासून भरविण्यास मान्यता दिली. त्यानुसार याबाबतच्या सूचना या महाविद्यालयांना आज, गुरुवारपासून विद्यापीठ प्रशासनाकडून दिल्या जाणार आहेत.



### कॅम्पसमध्ये पक्ष्यांची छायाचित्रे

विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विविध ९० प्रकारचे पक्षी आहेत. त्यातील प्रमुख ५० पक्ष्यांची माहिती आणि त्याबाबतची छायाचित्रे कॅम्पसमध्ये ठिकठिकाणी लावण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. यावर्षीचे अंदाजपत्रक दि. १० मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेत (सिनेट) सादर करण्याबाबत या बैठकीत शिफारस करण्यात आली. बांधकाम समितीच्या शिफारसी स्वीकारण्यात आल्या. भगवान महावीर अध्यासनाच्या समन्वयक पदाची तात्पुरती जबाबदारी डॉ. विजय ककडे यांच्यावर सोपविण्यासह पूर्णवेळ समन्वयक नियुक्तीची प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता दिली. तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी शासनाने मंजुरी देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# शासन आदेशानुसार महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्य शासन आणि युजीसीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करीत १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

डॉ. डी. जी. कणसे समितीने दिलेल्या अहवालानुसार महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. महाविद्यालयांनी ८० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा घ्यावी यासंदर्भात अभ्यास मंडळाने निर्णय घेण्यास मान्यता, राष्ट्रीय विज्ञान व गणित दिन साजरा करण्यास मान्यता व विद्यापीठ परिक्षेत्रातील हुपरी येथील उर्दू महाविद्यालयाला अल्पसंख्यांक दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२०-२१चे सुधारीत अंदाजपत्रक आणि शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे वार्षिक अंदाजपत्रक अधिसभेत सादर करण्यास मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठातील डॉ. प्रदिप भास्कर एआयसीटीमध्ये सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना आणखी एक वर्षाची वाढीव मुदत देण्यात आली. असे एकूण ३० विषय व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली.



- व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय
- उर्दू महाविद्यालयांना अल्पसंख्याक दर्जा

## विद्यापीठ परिसरात झळकणार जैवविविधतेची छायाचित्रे

शिवाजी विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, प्राणी, पक्षांची छायाचित्रे प्राणीशास्त्र विभागातील डॉ. ए. डी. जाधव यांनी टिपली आहेत. ही छायाचित्रे विद्यापीठ परिसरात दर्शनी भागात लावून परिसराचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या छायाचित्रांवर संबंधित वनस्पती, पक्षाच्या माहितीसाठी बारकोड दिला जाणार आहे. या बारकोडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह विद्यापीठात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संबंधीत छायाचित्राची माहिती मिळेल.

# डिजिटल कंन्टेंट अवतरणार थ्रीडी स्पेसमध्ये

## डॉ. शरद भगत यांनी केली मॅजिक लिप स्मार्ट गॉगलची निर्मिती

नंदिनी नरेवाडी - पाटोळे :
सकाळ वृत्तसेवा

**आम्ही कोल्हापुरी**



डॉ. शरद भगत

कोल्हापूर, ता. १० : नव्या पिढीच्या तंत्रज्ञानाच्या जडणघडणीत कोल्हापूरचा एक तरुण आघाडीवर आहे. स्मार्ट फोन, टीव्ही, जीपीएस, संगणक अशा तंत्रज्ञानालाही नवा अद्ययावत पर्याय विकसित करून मॅजिक लिप स्मार्ट गॉगलची निर्मिती डॉ. शरद भगत यांनी अमेरिकेतील मॅजिक लिप कंपनीच्या टीमबरोबर केली आहे. या गॉगलमुळे डॉक्टरांना दहापटीने जलद शस्त्रक्रिया करता येणार आहे.

अंतराळवीरांना पृथ्वीवर राहून अंतराळातील अनुभव घेत प्रशिक्षण घेता येणार आहे. सैनिकांना त्यातील जीपीएस प्रणालीचा वापर करून लक्ष्याकडे वाटचाल करता येणार आहे. ऑनलाईन शिक्षणात प्रगती होऊन लॅबोरेटरीतील एखादा प्रयोग घरात बसून व्हर्चुअली करता येणार आहे. दोनशे इंच वाईड स्क्रीनव्दारे थिएटरमध्ये सिनेमा पाहिल्याचा आनंद घेता येणार आहे. त्यांच्या ऑगमेंटेड रियालिटी टेक्नॉलॉजी संशोधनामुळे तंत्रज्ञानातील बदल वेगवान झाला आहे. या तंत्रज्ञानामुळे डिजिटल कंटेट थ्रीडी स्पेसमध्ये अवतरता येतो किंवा त्यावर प्रोजेक्टही करता येतो. डॉ. भगत यांचे पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र विषयात झाले. जगातील हलका मानवनिर्मित असलेल्या सिलिका एरोजेल या पदार्थनिर्मिती करत त्यांनी प्रा. डॉ. ए. व्ही. राव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. संपादन केली. त्यानंतर दक्षिण कोरियात पुकयोंग विद्यापीठात दोन वर्षे याच विषयावर संशोधन केले. २००८ मध्ये फ्लोरिडा स्टेट विद्यापीठात त्यांनी कमी जाडीची लेन्स असणाऱ्या चष्मा निर्मितीत संशोधनास सुरवात केली. यामध्ये त्यांनी कितीही जास्त नंबरचा चष्मा असला तरी त्याला कमी जाडीच्या लेन्स वापरून चष्मा तयार केला. सध्या ते अमेरिकेतील मॅजिक लिप कंपनीमध्ये लिड मटेरियल्स सायटिंस्ट या पदावर कार्यरत आहेत.

२०१४ मध्ये वर्जिनिया विद्यापीठात सुपरहायड्रोफोबिक मटेरिल्सबाबत संशोधन केले. एखाद्या धातूवर किंवा विजेच्या तारांवर पाणी किंवा बर्फ जास्त काळ राहिल्यास ते गंजण्याचा धोका असतो. ते गंजू नये यासाठी त्यांनी सुपरहायड्रोफोबिक मटेरिल्स वापरून त्याचे कोटिंग घराचे छत, विजेच्या तारांवर वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या धांतुच्या पृष्ठभागावर घातले. **(समाप्त)**

### मिळालेले अॅवॉर्डस्

- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्रोजेक्ट फेलो
- भारत शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे सीनिअर रिसर्च फेलोशिप
- गॅप अॅवॉर्ड, फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटी
- फेलोशिप फ्रॉम नॅशनल सायन्स फाउंडेशन (अमेरिका)



# महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यातील महाविद्यालये सुरू करण्यास सरकारने परवानगी दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठांतर्गत येणारी महाविद्यालये सुरू करण्यास मंगळवारी विद्या परिषदेने मान्यता दिली होती, तर बुधवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ही महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

राज्य सरकारने १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याच्या सूचना राज्यातील विद्यापीठांना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यक्षेत्रातील महाविद्यालये सुरू करण्यासाठी विद्यापीठात वरिष्ठ पातळीवर तयारी सुरू आहे. मंगळवारी यासंदर्भात विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला, तर बुधवारी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. महाविद्यालये सुरू करण्यासाठी आवश्यक नियमावली तयार करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर मार्चमध्ये होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या बजेटसंदर्भातील बैठकीत चर्चा झाली. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात विविध पक्ष्यांचा वास आहे. त्यापैकी निवडक पन्नास पक्ष्यांची छायाचित्रे शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात लावण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

# कुंभार समाजात 'डहाक' विधीचा कुलाचार

## मृताच्या बाराव्याला डहाक वादन; पौराणिक देव-देवतांच्या गीतांचे सादरीकरण

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : फिरत्या चाकावर मडक्यासह सुबक, रेखीव व आकर्षक गणेशमूर्ती करण्यात कुंभार समाज व्यग्र असतो. हा समाज वैविध्यपूर्ण मातीची भांडी करण्यातही मागे राहत नाही. या समाजातील चाली-रीतींची एक बाजू मात्र तितकीच महत्त्वपूर्ण आहे. 'डहाक' किंवा 'डाक' हा विधी कुंभार समाजात परंपरेने चालत आला आहे.

घरातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या बाराव्या




दिवशी तो केला जातो. 'डहाक' किंवा 'डाक' हे विधीत वाजवल्या जाणाऱ्या वाद्याचे नाव आहे. डमरूसारखे पण थोड्या मोठ्या आकाराच्या या वाद्याला दोन्ही बाजूला कातडे असते. या वाद्याच्या नावावरूनच या विधीला हे नाव पडले आहे. कुंभार समाजातील कुलाचार म्हणून हा विधी केला जातो. गाण्यातील आशयाचा मृत्यूशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असतो. हा विधी करण्यासाठी पाच ऊस बांधून चौक केला जातो. पाटावर १८ पानांच्या विड्यांवर १८ पैजा म्हणजे तांदळाच्या पिठाची १८ चित्रे करून ठेवली जातात. त्यात गणपती, नारद, कृष्ण, महादेवाची पिंड, गाय-वासरू, गंजेसावज, चंद्र, सूर्य, नाग, सुवर्णपिंपळ, शिडी, मूत्रपिंड, केंदाळफूल, कावळा, पिशामृत, अमृतकुंभ अशा तांदळाच्या पिठापासून बनवलेल्या अठरा पैजा असतात. या विधीत 'डक्का' हिला अग्रपूजेचा मान आहे. ती भार्गव ऋषींची कन्या असून तिचा त्यांच्या डाव्या दंडातून जन्म झाला, असे समजले जाते. या विधीच्या सुरुवातीला उदमती व त्यानंतर पानाडी म्हटली जाते. मृत व्यक्तीचा पिंड तयार करून त्याला पाणीही पाजले जाते. या विधीनंतर आख्यानाला सुरुवात केली जाते. यात पंडूराजाची कथा महत्त्वाची ठरते. कथा झाल्यानंतर भातकं म्हटलं जातं.

### मराठा घराण्यातही डहाक

डहाक अथवा डाक विधी कुंभार समाजात प्रामुख्याने केला जात असला तरी काही मराठा समाजातील घराण्यातही केला जातो. मात्र, तो करत असताना त्याचा मान कुंभार समाजाला दिला जात असल्याचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे सांगतात.